पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २४/३/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २३२१**

मा.श्रीमती लताताई राजगुरु व मा.सौ.विद्या भोकरे यांचे दि. १६/३/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ३७ डॉ.नायडु हॉस्पिटलमधील झोपडपट्टीकरीता एम.एस.ई.बी.चे घरगुती लाईट मिटर कनेक्शनचे एम.एस.ई.बी.चे फिडर बसविणेकरीता र.रु. १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, पान क्रं. २९१, अ.क्र. ६, यादी क्र. एस-१५, शहरात विविध ठिकाणी संरक्षक भिंत बांधणे वॉर्ड क्र. ३७ मध्ये नदीकिनारी संरक्षक भिंत बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्रं. ३७ डॉ.नायडु हॉस्पिटलमधील झोपडपट्टीकरीता एम.एस.ई.बी.चे घरगुती लाईट मिटर कनेक्शनचे एम.एस.ई.बी.चे फिडर बसविणे | --- | १० लाख |

**विषय क्र. २३२२**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. १८/३/२००९ चे पत्र.

हडपसर आनंदनगर स.नं. २११ मधील सरकारी जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी बचत गटातील महिला सक्षमीकरणासाठी महिला भवन बांधण्यात यावे.

**विषय क्र. २३२३**

मा. राजाभाऊ बराटे व मा.किरण बारटक्के यांचे दि. १९ /३/२००९ चे पत्र.

कर्वेनगर स.नं. ६/८ व स.नं. ६/१३ येथे रिकामा भूखंड असून त्यांचा उपयोग सध्या फक्त जनावरे पाळण्यासाठी होत आहे.त्यामुळे तेथील नागरिकांना त्याचा फार त्रास होत आहे.त्याभागातील नागरिकांनी तेथे गार्डन अथवा उद्यान करण्याबाबत सुचविलेले आहे.

तरी कर्वेनगर स.नं. ६/८ व स.नं. ६/१३ या ठिकाणी गार्डन अथवा उद्यान विकसित करण्यात यावे.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २३२४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २५/१०/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/८४१ दि. १३/३/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३६,७०,४३५/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २३२५**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १८/१०/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १४/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/८४२ दि. १३/३/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ५५,२६,३७०/- चा तक्ता माहितीसाठी.

Unregistered

**विषय क्र. २३२६**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १/११/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २८/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/८४७ दि. १३/३/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,८३,०७४/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्रं. २३२७**

दि. २/३/२००९ ते दि. ८/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१५१६ दि. १३/३/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. २३२८**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील धनकवडी पेठ विभागाच्या सन १९९८-९९ मधील मिळकतकरांच्या ठरावबंदाची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/४५७ दि. १७/१/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. २८ सन २००६-०७ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१५१७ दि. १६/३/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. २३२९**

आयातकर कार्यालयाकडील खातेदार पुना सिगारेट व जवाहर एजन्सी या कंपनीची सन २०००-०१ ते २००२-०३ मधील हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/१९६ दि. २०/८/२००३ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ७ सन २००३-०४ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१५१८ दि. १६/३/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. २३३०**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील बुधवार पेठ फ्लॅटवाईज विभागाकडील सन १९९८-९९ व सन १९९९-२००० मधील मिळकतकरांच्या ठरावबंदाची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/६१६ दि. ३०/३/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५३ सन २००६-०७ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी क्रं. मआ/मुले/१५२१ दि. १९/३/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. २३३१**

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी फायबर मुताऱ्या बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार एम.एस.एस.आय.डी.सी.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४५,५६,७९५=०३ पेक्षा ०.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४५,३४,०११=०३ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/गवनि/१४८८ दि. २६/२/२००९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १२/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

**विषय क्र. २३३२**

केंद्र शासन अनुदानित प्रकल्पाअंतर्गत काम करुन घेणारे मे.एन.बी.सी.सी.यांचेसमवेत सामंजस्य करार (Memorandom of Understanding) करणेस व प्रकल्प राबविणेस मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांचेबरोबर सवलतीचा करारनामा (Concession Agreememt) करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेन्टेनन्स पोटी फी अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/एचओ/१४९९ दि. २६/२/२००९ चे पत्र.

१) मे.एन.बी.सी.सी.या संस्थेची केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत करावयाच्या कामांसाठी नेमणूक केलेली असल्याने त्यांचेबरोबर सामंजस्य करार (Memorandom of Understanding) करणे

२) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. या कंपनीबरोबर मे.एन.बी.सी.सी.यांनी मागविलेल्या निविदातील अटी व शर्तीनुसार सवलतीचा करारनामा करणे व प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी त्यांचेकडून मोफत चालवून घेणेस व त्यापुढील कालावधीसाठी नमूद केल्याप्रमाणे फी आदा करणेस

३) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेन्टेनन्स पोटी मनपाने प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे फी अदा करणेस

| अ.क्र. | कालावधी | फी दर |
|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्षे | नाही. |
| २ | ६ ते १० वर्षे | र.रुपये ५५/– प्रति मे.टन |
| ३ | ११ ते १५ वर्षे | र.रुपये ६०/– प्रति मे.टन |
| ४ | १६ ते २० वर्षे | र.रुपये ६७/– प्रति मे.टन |
| ५ | २१ ते २५ वर्षे | र.रुपये ७४/– प्रति मे.टन |
| ६ | २६ ते ३० वर्षे | र.रुपये ८२/– प्रति मे.टन |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १२/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३३**

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांचेकडून सन २००५–२००६ मधील मंजूर कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी उचलणेस तसेच रुपये १७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारण्यासाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१४४९ दि. २४/२/२००९ चे पत्र.

१) सन २००५–०६ या वित्तीय वर्षात बँक ऑफ महाराष्ट्र बाजीराव रोड शाखा पुणे यांचेकडून मा.मुख्य सभा व मे.राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार मान्य कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी तीन वर्ष पूर्ण झाल्याने नविन कर्ज (Fresh Term Loan) या स्वरुपात सद्यपरिस्थितीतील विद्यमान बाजारदराने बी.पी.एल.आर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. या व्याजदराने तसेच भविष्यात बीपीएल आर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार उचलणेस

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांच्या दि. २९ डिसेंबर २००८ च्या पत्रातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांचेकडून बीपीएलआर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. (सध्याचा बीपीएलआर दर १२.७५%) व्याजदराने तसेच बदलत्या बीपीएलआर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार र.रुपये १,७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारणेस व मे.राज्य शासनाची मान्यता घेण्यास

३) सदरचे कर्ज वित्तीय आवश्यकतेनुसार उचलणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १७/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. २३३४**

मनपा निधीमध्ये उपलब्ध होणाऱ्या र.रुपये ७० कोटीची गुंतवणूक १३ महिने मुदतीसाठी करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१५१५ दि. ९/३/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १७/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

## संकिर्ण

**विषय क्रं. २३३५**

पुणे बाणेर स.नं. ५/२/२ या मिळकतीमधील पुणे मनपाच्या ताब्यात येणाऱ्या १६०२.४७ चौ.मी.क्षेत्राची ॲमेनिटी स्पेस मा.नगर अभियंता ठरवतील त्या दराने दिर्घ मुदतीकरीता परराष्ट्र व्यवहार विभाग मंत्रालयाचे पासपोर्ट कार्यालयाकरीता देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजिं)/१५१९ दि. १७/३/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २३३६**

पेशवे उर्जा उद्यान पुणे मनपाकडे हस्तांतरीत करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उकाजा/१५२० दि. १८/३/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २३३७**

ऑडीट उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ६०८४ दि. १९/३/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २३३८**

अपिल उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ६०८५ दि. १९/३/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २३३९**

आयातकर कार्यालयाकडील खातेदार मे.चमाडिया सन्स या कंपनीची सन २००३–०४ मधील हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/४५२ दि. २३/१२/२००५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ३९ सन २००५–०६ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/मुले/१५२२ दि. १९/३/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

**विषय क्रं. २३४०**

दि. ९/३/२००९ ते दि. १५/३/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१५२३ दि. १९/३/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

UnRegistered

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**स्थायी समिती**
**दाखल विषय – दि. २४/३/२००९**

**विषय क्रं. २३४१**

मा.सौ.मंगला मंत्री व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २४/३/२००९ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. ११७१ दि. ६/११/२००८ चा फेरविचार करुन मुळ प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात यावा. (सर्व्हे नं. ४७ (भारत फोर्ज कंपनीसमोर) घोरपडी गांव, पुणे १ याठिकाणी व्हेज मार्केट व शॉपिंग सेंटर यासाठी आरक्षित असलेली जागा संपादन करणेबाबत)

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

UnRegistered